Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2018

Special Issue-66

## Society, Culture and Environment

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Satish Desai
Asso. Prof. Department of Sociology
Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe College,
Miraj, Dist-Sangli [M.S.] INDIA

Assistant Professor
Sunderrao Solanke Mahavidyalaya
Majalgaon Dist.Beed.(M.S)

RESEARCH JOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

Swatidhan Publications

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013)
UGC Approved Journal | Special Issue 66- | October. 2018



| | | |
|---|---|---|
| 24 | Noise Pollution on Pune – Solapur Highway: A Case Study of Tembhurni Village in Solapur District (M.S.) Shri. Nangare M. R. & Miss. Patil S. S. | 107 |
| 25 | Cultural Trends in Current Scenario Dr. G. N. Nimbarte | 111 |
| 26 | Wrapping Food in Newspaper is Harmful Dr. Rahul Pardeshi | 115 |
| 27 | Engaging with Postmodernism : Helen Dunmore's Novels Dr. Leelawati Patil | 119 |
| 28 | Environmental Safety of Street Food and Hygiene in Pimpri-Chinchwad Region Dr. Prakash Patil | 123 |
| 29 | Socio-Cultural Factors and Environment Vijay Patil | 127 |
| 30 | Concept of "Commune" in *'Ekek Paan Galawaya'* Dr. Sonali Pawar. | 131 |
| 31 | Environmental Monitoring : Tool of Healthy Environment Smt. Asha Potalwad | 140 |
| 32 | Impact of Jalshiwar Yojana on the Growth of Income in Drought Prone Area (A Case Study of Village Dhamangaon in Barshi Tahsil of Solapur District) Dr. V. K. Pukale | 143 |
| 33 | Studies On Sacred Groves As Spiritual Forest Pockets To Consurve Natural Resources: A Study With Reference To Sangli District Sanjay Sathe, Pandurang Kale and Satish Desai | 149 |
| 34 | Effect of Biofertilizers on Seed Germination of Maize (Zea Mays L.) Varieties Eco-92 And African Tall Madhumati Shinde, S. K. Khade & C. R. Patil | 160 |
| 35 | Folk Marriage Songs of Karnataka and Its Relevance to Modern Culture Dr. Nalini Waghmare | 165 |



## मराठी विभाग



| | | | |
|---|---|---|---|
| 36 | भारतीय समाज व आदिवासी संस्कृती परंपरा | डॉ.आर.एम.भिसे | 170 |
| 37 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे "ग्रामगीतीतील" पर्यावरणपूरक विचार | डॉ. चंपाताई बोधले | 173 |
| 38 | पर्यावरण संवर्धनासाठी सुसंस्कृतीची गरज | प्रा. बालाजी बोडके | 176 |
| 39 | समाज व सामाजिक परिवर्तन | प्रा.गंगाधर चव्हाण | 179 |
| 40 | मराठवाड्यातील समाज व संस्कृती : एक दृष्टीक्षेप | डॉ. अनिल देशमुख | 181 |
| 41 | पर्यावरण संरक्षण चळवळ : एक काळाची गरज | डॉ. सुरेश धनवडे | 188 |
| 42 | धनगर समाज आणि सामाजी परिवर्तन : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. अनिल गाडेकर | 193 |
| 43 | कोमकना गावगाडा व जात : वर्चस्वाची सत्ता समीकरणे | डॉ. नितीन गायकवाड | 198 |
| 44 | भारतीय ग्रामीण संयुक्त कुटुंबाच्या परिवर्तनाचा अभ्यास | डॉ. एस. एम. गावंडे | 201 |
| 45 | मध्ययुगीन धार्मिक अभिसरण आणि सांस्कृतिक वारसा | श्री अभिजीत भाडगे | 206 |
| 46 | संस्कृती आणि पर्यावरण यांचे शाश्वत विकासातील योगदान | डॉ. अंजली जोशी- टेंभूर्णीकर | 212 |
| 47 | साहित्य आणि समाजाचे अनुबंधात्मक विश्लेषण | डॉ. पुरुषोत्तम जुन्रे | 217 |
| 48 | १९४२ च्या चलेजाव चळवळीतील शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे योगदान | डॉ संतोष कदम | 221 |
| 49 | देशभक्त नीलासार आणि समकालीन राजकीय परिस्थिती | डॉ. गोविंद काळे | 226 |
| 50 | महाराष्ट्रातील दलित चळवळ : एक सामाजिक बदल | प्रा. रावसाहेब कांबळे | 231 |
| 51 | भारतीय खेड्यातील समाज आणि संस्कृतीचा सांस्कृतिक आणि मानववंश शास्त्रीय अभ्यास | डॉ. संजय कांबळे | 235 |
| 52 | समाज आणि पर्यावरण | प्रा. संभाजी कांबळे | 244 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) -6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013)
UGC Approved Journal | Special Issue 66- | October. 2018

# पर्यावरण संवर्धनासाठी सुसंस्कृतीची गरज

प्रा. बालाजी रावसाहेब बोडके
इतिहास विभाग प्रमुख,
सुंदरराव सोळंके महाविद्यालय,
माजलगाव जि.बीड - ४३११३१
Email : balajiraosahebbodke@yahoo.com

आपली पृथ्वी ही आपल्याला निसर्गाकडून मिळालेला अमुल्य ठेवा आहे. मानव जातीच्या विकासासाठी निसर्गाचे जतन व संवर्धन करणे हे खऱ्या अर्थाने आपल्या प्रगतीची गुरूकिल्ली आहे. निसर्गाचे रक्षण करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी असल्याने पर्यावरणाचे रक्षण करणे हे आपले प्रमुख कर्तव्य ठरते. त्यासाठी आपल्या सभोवतालच्या पर्यावरणाची आपल्याला संपूर्ण ओळख होणे अत्यंत आवश्यक आहे. अनिर्बंध विकास प्रक्रिया तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासंबंधीचे आपले अज्ञान पर्यावरणाच्या ऱ्हासाच्या मुळाशी असल्यामुळे जगातील कोणतीही व्यक्ती पर्यावरणाशी संबंधित गोष्टीपासून दुर राहु शकत नाही. त्यामुळे पर्यावरणाविषयी समाजात जागरुकता निर्माण व्हावी तसेच निसर्गाचे जतन व संवर्धन करण्याची संस्कृती समाजात निर्माण व्हावी हा प्रस्तुत शोध निबंधाचा प्रमुख उद्देश आहे.

**संशोधकाचे गृहितके :**

१. पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे अतिवृष्टी व ढगफुटी होते.
२. पर्यावरणाच्या ऱ्हासाला विविध कारणे जबाबदार आहेत.
३. पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे रोगराई पसरते.
४. पर्यावरणाच्या असंतुलनामुळे तापमानात वाढ होऊ शकते.
५. पर्यावरणाच्या असमतोलामुळे वातावरणात बदल होतो.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. अतिवृष्टी व ढगफुटीसारख्या पर्यावरणीय समस्या समजावून घेणे व उपाय सुचविणे.
२. पर्यावरणी समस्यांची कारणे व परिणामांचा आढावा घेणे.
३. पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी औषधी वनस्पतीची लागवड करणे.
४. तापमान वृद्धीचा आढावा घेणे.
५. नैसर्गिक समतोल राखण्यासाठी जनजागृती करणे.

प्रस्तुत शोध निबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला असून शोध निबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतींचा उपयोग केला आहे. त्यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, इंटरनेट व वर्तमानपत्रे इत्यादीचा वापर करून माहितीचे संकलन करण्यात आले आहे.

एकविसाव्या शतकाच्या सुरूवातीलाच मानवाने आपल्या असिम बुद्धीमत्तेच्या जोरावर प्रगतीची अनेक शिखरे गाठलेली आपण पाहत आहोत. माहिती तंत्रज्ञान, जैव अभियांत्रिकी, नॅनो टेक्नॉलॉजी, अनुऊर्जा, इत्यादी अनेक क्षेत्रात प्रचंड वेगाने प्रगती घडून येत असली तरी त्याच्या जोडीने मानवास अनेक पर्यावरणीय समस्यांची जाणीव प्रकर्षाने होऊ लागली आहे.[१] त्यामुळे समाजात पर्यावरणपूरक संस्कृती निर्माण करणे अत्यावश्यक झाले आहे.

जिवधारणा व जिविकोपार्जन या मानवासाठीच नव्हे तर सृष्टीतील सर्वच प्राण्यांसाठी महत्त्वाच्या गरजा आहेत. सर्व प्राणीमात्रांच्या जीवनापैकी बराचसा भाग या गरजांच्या पूर्तीशी संबंधीत असलेल्या प्रयत्नांमध्ये व्यतित होतो. यादृष्टीने विचार केल्यास अन्य प्राणी व मानव यांच्यात काही फारसे भेद नाहीत. पण जीवनासाठी अनिवार्य असलेल्या मुलभूत गरजांची पूर्ती

रण्याच्या प्रकाराचा विचार केल्यास मनुष्य व अन्य प्राणी यांच्यात महत्त्वपूर्ण भेद आढळतात. हे भेद कशा स्वरूपाचे आहेत आपणास सहज समजण्यासारखे आहे. भुक, काम, संरक्षणादी गरजांचा विचार केल्यास या गरजांची पूर्ती करण्याचे ानवाचे मार्ग व अन्य प्राण्यांचे मार्ग यांच्यात खूपच फरक आहे. हे सहजच लक्षात येण्यासारखे आहे. मानव व मानवेत्तर ाण्यांच्या जीवनातील हे भेद स्पष्ट करतांना असे म्हटले जाते की, मानवाची जीवन जगण्याची पद्धती म्हणजेच संस्कृती ोय.[२]

संस्कृती या शब्दाची निर्मिती Cultura या लॅटिन शब्दापासून झालेली असून त्याचा अर्थ संस्कृतीशी संबंधित आहे. संस्कार या संस्कृत शब्दापासून संस्कृती हा धातू तयार झालेला आहे व त्याचा अर्थ संस्कारित वर्तन असा आहे. [३] ज्यामुळे जीवन समृध्द होते तिलाच संस्कृती असे म्हटले जाते. लोकांचे आचार विचार, चालीरिती, कला, तत्वज्ञान या सर्वांचा समावेश संस्कृतीत होतो. धार्मिक, सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक व पर्यावरणीय इत्यादी विविध क्षेत्रात होत असणाऱ्या प्रगतीलाही संस्कृती असे म्हणता येते.[४] संस्कृती या शब्दात 'सं' कार लागल्यामुळे त्याचा अर्थ योग्य प्रगती करणे, विकसित होणे, वाढ होणे, शुध्द होणे, शिष्ट होणे असा आहे. डॉ.ब्रजविहारी निगम यांनी 'संस्कृती एवं समस्या' यात म्हणतात की. संस्कृती किसी भी देश की किसी विशिष्ट काल की जीवन पद्धती उसके आदर्श तथा उसके प्राप्त करणे की विधीना एवं इस प्रकिया मे होनेवाले बाह्य एवं आंतरिक परिवर्तनोका लेखाजोखा है।[५] झा और श्रीमाली कहते है की, वह अपनी आवश्यकताओं की पूर्ती वातावरण से और उसके साथ मिलकर करता है । वातावरण की जीन वस्तुओं को मनुष्य अपनी आवश्यकताओं की पूर्ती के लिए एक विशेष रुप में ढाल लेता है, उन्हे प्रागैतिहासिक पुरातत्ववेत्ता की भाषा में संस्कृती कहाँ जाता है ।[६]

पर्यावरण ही संज्ञा फ्रेंच भाषेतील Environ या शब्दापासून प्रचलित झाली आहे. Environ चा अर्थ to suround म्हणजेच सभोवताली असणे किंवा सभोवतालची परिस्थिती असा आहे. पर्यावरण ही संकल्पना स्थल, काल आणि जीवन सापेक्ष आहे. फंक व वॅगनन्स म्हणतात की, व्यक्ती व जीव अथवा समूह यांच्या अस्तित्व व विकास यांच्यावर परिणाम करणारी बाह्यस्थिती घटक किंवा वस्तू म्हणजे पर्यावरण होय.[७] थोडक्यात संस्कृती ही योग्य संस्काराने संस्कारित होऊन पर्यावरणाशी संबंधित होणे आणि मानव सृष्टीचा विकास करणे यासाठीच सुसंस्कृतीची गरज आहे.

पर्यावरण हे वातावरण, जलावरण, शिलावरण यातून तयार होत असते. पर्यावरणामध्ये परिसंस्था, प्रदुषण, नैसर्गिक साधनसंपत्ती, जैवविविधता आणि तीचे संवर्धन, पर्यावरणाशी संबंधीत सामाजिक प्रश्न, लोकसंख्या, ऊर्जा संसाधने, पर्यावरण, आरोग्य, कायदे आणि त्यांची अंमलबजावणी, पर्यावरण व्यवस्थापन यांचा अभ्यास केला जातो. म्हणून मानव आणि पर्यावरण यांचा संबंध उत्क्रांतीच्या सर्वच टप्प्यामध्ये विकसित झालेला आढळून येतो. किंबहुना आपल्या सभोवतालचे पर्यावरण हे प्रथमतः तयार झाले आणि नंतरच्या कालखंडात मानवाची निर्मिती झाली हे शास्त्रीय सत्य आहे. त्यामुळे हवा, पाणी, जमिन व वनस्पती या सर्व गोष्टींना मानवाच्या जीवनावर अनन्य साधारण महत्त्व आहे. म्हणून पर्यावरणाचे जतन व संवर्धन करण्याची संस्कृती निर्माण केली पाहिजे.

**पर्यावरण ऱ्हासाची कारणे :**

वाढती लोकसंख्या, जंगलतोड, पाण्याचा अतिवापर व अयोग्य नियोजन, खनिज संपत्तीचा अतिवापर, आधुनिक यंत्रांचे परिणाम, जंतुनाशके व किटकनाशके, पर्यायी ऊर्जेचा वापर, अणुऊर्जा, प्रदुषणातील वाढ, नैसर्गिक आपत्ती, मानवनिर्मित आपत्ती, शहरीकरण व वाढते औद्योगिकरण इत्यादी कारणांमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे.

**उपाय योजना :**

१. लोकसंख्येवर नियंत्रण आणले पाहिजे.
२. पर्यावरण संवर्धनाविषयी जनजागृती करणे.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013)
UGC Approved Journal | Special Issue 66- | October. 2018

३. कायदे करणे व त्याची अंमलबजावणी करणे.
४. जल, जंगल, जमिन यांचे आरोग्य सुधारणे.
५. पाण्याचे योग्य नियोजन करणे.
६. नैसर्गिक साधनसामुग्रीचा वापर करणे.
७. जैवविविधतेत वाढ करणे.
८. पर्यावरणाचे शिक्षण देणाऱ्या संस्था काढणे.
९. शेतीपूरक व निसर्गानुकूल रोजगार निर्माण करणे.
१०. वृक्षारोपण व संवर्धन करणे.
११. चंगळवाद कमी करणे.

**सारांश :**

थोडक्यात निरोगी वातावरण, निरोगी शेती, निरोगी पर्यावरण, निरोगी अन्न आणि निरोगी आरोग्यासाठी आपणाला वरील उपाययोजना अंमलात आणाव्या लागतील तरच पर्यावरण संस्कृतीचे जतन व संवर्धन करणे सोपे जाईल आणि मानव व सजिवसृष्टी समोरील अनेक समस्या सुटु शकतील. संत तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे" तसेच "शुद्ध बिजापोटी फळे रसाळ गोमटी" म्हणजे चांगले कार्य केले तर चांगलेच फळ मिळेल, सजिवसमुह सुखशांतीने नांदेल. त्यामुळे पर्यावरणाचे जतन व संवर्धन केले पाहिजे, तरच शुध्द हवा, शुद्ध पाणी, शुद्ध अन्न मिळु शकते, आणि मानवी जीवन सुखी व समृध्द बनते.

**संदर्भ :**

१. प्रा.माने अशिष, पर्यावरण अभ्यास एक आधुनिक दृष्टीकोन, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, २००५, पृ.क्र.१३
२. वैद्य नि.स.,समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपुर, १९८९, पृ.क्र.५०
३. डॉ.शर्मा ओ.पी.,समाजशास्त्र की मुल अवधारणाएँ, विकास प्रकाशन, कानपुर, २००४, पृ.क्र.२०८
४. प्रा.गजेंद्रगड व्ही.एन., समकालिन भारतीय समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०००, पृ.क्र.१४
५. डॉ.भावुक कृष्ण, भारतीय संस्कृती की महिमा विविध आयाम, प्रेम प्रकाशन, दिल्ली, १९९७, पृ.क्र.०९
६. झा डी.एन.अॅण्ड श्रीमाली, प्राचीन भारत का इतिहास, हिंदी माध्यम निदेशालय, दिल्ली, २०११, पृ.क्र.३३
७. भरुचा एरक, पर्यावरण शास्त्र, ओरिएंटल प्रकाशन, हैद्राबाद, २००७
८. प्रा.पंशवे सुहास, वावरी मोहन, पर्यावरण अभ्यास, मंजुशा प्रकाशन, नळदुर्ग, २००४
९. अंग्रायन
१०. वेबसाईट

Assistant Professor
Sunderrao Solanke Mahavidyalaya
...on Dist. Beed (M.S.)

Peer Reviewed Referred
and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

# AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

ISSN 2277-5730



# AJANTA

Volume - VII, Issue - IV
Marathi Part - I
October - December - 2018

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

AJANTA PRAKASHAN

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII Issue - IV MARATHI PART - I October - December - 2018

**Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| Sr. No. | Name & Author Name | Page No. |
|---|---|---|
| २६ | इतिहास व सामाजिकशास्त्रासमोरील आव्हाने व उपाय<br>**प्रा. बोडके बालाजी रावसाहेब** | १२३-१२६ |
| २७ | जीवनरहस्याच्या शोधासाठी कुणा एकाची भ्रमणगाथा<br>**डॉ. एम. ए. कव्हळे** | १२७-१३० |
| २८ | दातृत्व संपन्न देवचंद शहा<br>**डॉ. संभाजी विश्वासराव माने** | १३१-१३६ |
| २९ | मराठेकालीन विवाह व स्त्रियांचे स्थान : एक अभ्यास<br>**भुयेकर पूनम रमेश** | १३७-१४० |
| ३० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इतिहास विषयक दृष्टिकोण<br>**रुपाली रामराव लांगडे** | १४१-१४४ |
| ३१ | श्री वारणा विभाग सत्कार्य संवर्धन मंडळ सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व शैक्षणिक कार्य<br>**प्रा. डॉ. माधुरी राजाराम खोत** | १४५-१४८ |

VOLUME - VII, ISSUE - IV – OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# २६. इतिहास व सामाजिकशास्त्रासमोरील आव्हाने व उपाय

**प्रा. बोडके बालाजी रावसाहेब**
इतिहास विभाग, प्रमुख, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगांव जि. बीड.

नाचु किर्तनाचे रंगी, ज्ञानदिप लावु जगी ! असे संत नामदेवांनी म्हटले आहे. यावरून ज्ञान ही सर्वसमावेशक बाब आहे. प्लेटोसारख्या तत्ववेत्याने ज्ञानाच्या सर्वसमावेशक स्वरूपावर भर देवून तत्वज्ञाने देखील गणित भूमितीसारख्या विषयांचे ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे असे म्हटले. सर्वच ज्ञानशाखा ह्या दृष्टीगोचर विश्वातील नानाविध बाबींशी संबंधित असल्यामुळे त्या परस्पर निगडीत असणे स्वाभाविक आहे. काळाच्या ओघात ज्ञानाचे विशेषीकरण होऊ लागले. तसे एकेकाविषयांचे सखोल अध्ययन करणाऱ्या ज्ञानशाखा स्वायत्त बनत गेल्या त्यांना स्वतंत्र रूप आले. त्यांची स्वतंत्र कार्यकक्षा व कार्यपध्दती विकसीत झाली. त्यांची खास अशी वैशिष्ट्यो एका ज्ञानशाखेहून दुसऱ्या ज्ञानशाखेचे भिनत्व दर्शविणारी वैशिष्ट्यो स्पष्ट होवू लागली. प्रत्येक ज्ञानशाखा कितीही म्हटले तरी इतर ज्ञानशाखांशी थोड्याफार प्रमाणात संबंधित असते. तसेच ती इतर ज्ञानशाखांना काही प्रमाणात प्रभावितही करते. सर्वांगिण संपुर्ण ज्ञान हे त्याचे फलित असते. म्हणुन प्रस्तुत शोधनिबंधात अंतरज्ञानशाखीय अध्ययनाचे महत्व विशद करून त्यांच्यापुढील आव्हानांची उकल करण्यात आली आहे.

**संशोधनाची गृहितके**

१. समाजिकशास्त्रासमोर नैसर्गिक आव्हाने आहेत.
२. सामाजिकशास्त्रासमोर मानवनिर्मित आव्हाने आहेत.
३. सामाजिकशास्त्रासमोर अनेक आव्हाने आहेत.
४. सामाजिकशास्त्रात आंतरज्ञानशाखीय अभ्यास करणे सोपे आहे.
५. सामाजिकशास्त्रासमोर विद्यार्थी गळती ही समस्या आहे.

**संशोधनाची उद्दीष्टे**

१. सामाजिकशास्त्रासमोरील नैसर्गिक आव्हानांचा आढावा घेणे.
२. सामाजिकशास्त्रासमोरील मानवनिर्मित आव्हानांचा आढावा घेणे.
३. सामाजिकशास्त्रासमोरील आव्हानांचा अभ्यासकरणे आणि उपाय सुचविणे.
४. सामाजिकशास्त्रातील आंतरज्ञानशाखीय अध्ययनांचा आढावा घेणे.
५. विद्यार्थी गळतीचा अभ्यास करणे व उपाय सुचविणे.

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला असुन दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग केला आहे. यामध्ये विविध संदर्भग्रंथ, पुस्तके, इंटरनेट व वृत्तपत्रे इ. वापर करून माहितीचे संकलनप करण्यात आले आहे.

सामाजिकशास्त्रे म्हणजे समाजाच्या मनाचा व वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्रे आहेत. यात समाजाच्या समस्या महत्वाच्या आहेत. आजच्या समाजासमोरील समस्या बघितले तर दुष्काळ, अतिवृष्टी, रोगराई, तापमान वाढ, ढगफुटी, भुकंप इ. नैसर्गिक समस्याबरोबरच मानवनिर्मित समस्या हि आहेत. ज्यात हुंडा, बालविवाह, शिक्षण, रोजगार, गरीबी, गर्भपात, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, युध्द लढाया, सामाजिक विषमता, खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण, कौंटुबीक विघटन, शिक्षणातील गळती, कुपोषण, बेकारी, नागरिकीकरण, गुन्हेगारी, दारिद्र्य, वेश्याव्यवसाय, झोपडपट्टी, भ्रष्टाचार इ. समस्या सामाजिकशास्त्रासमोर आव्हाने म्हणुन उभे टाकलेले आहे. आणि त्याला प्रतिसाद देणे गरजेचे आहे. संस्कृतीच्या चिंतनातून अर्नाल्ड टॉयन्बी यांनी आव्हान व प्रतिसादाचा सिध्दांत प्रतिपादीला आहे. निरनिराळ्या आव्हानांना सामोरे जातच संस्कृती विकसीत होत जाते. त्याचप्रकारे सामाजिकशास्त्रांनाही आव्हानांना प्रतिसाद देत–देत आपला विकास करावा लागतो.

सामाजिक समस्येचे निराकरण करणे, यावर आवाज उठवणे, जनजागृती करणे हे सामाजिकशास्त्राचे काम आहे. सामाजिकशास्त्रात इतिहास, राज्यशास्त्र, भुगोल, तत्वज्ञान, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, साहित्य इ. शास्त्रांचा समावेश होतो. इतिहासाबाबत विचार करताना इतिहासाचा अंतर्भाव शास्त्रीय ज्ञानशाखांमध्ये करावयाचा की नाही? इतिहास हे शास्त्र आहे का? इतकेच नव्हे तर इतिहासाचा समावेश सामाजिकशास्त्रात करावा कि नाही ? असे अनेक वादग्रस्त मुद्दे उपस्थित केले जातात. परंतु इतिहास हि गतकालीन मानवी जीवनाचे अध्ययन करणारी ज्ञानशाखा असल्यामुळे आणि सर्व ज्ञानशाखा मानवी जीवनाशी सबंधित असल्यामुळे इतिहासाचा इतर ज्ञानशाखांशी केवळ मानसशास्त्राशीच नव्हे तर भौतिकशास्त्राशीही निकटचा संबंध आहे. ह्या सर्व ज्ञानशाखा मानवाच्या विकासाला आपापल्या पध्दतीने हातभार लावतात म्हणून फ्रान्सीस बेकन म्हणतो की, इतिहास म्हणजे मानवाला शहाणी करणारी विद्याशाखा होय.

आज 21 व्या शतकात युध्द, लढाया परवडणारे नाही, कारण सर्व राष्ट्रे जवळपास शस्त्रास्त्राने सज्ज आहे. त्याचा कोणीही अण्वीक व तत्सम शस्त्रास्त्राचा वापर करणार नाही अशी आज मानसिकता तयार करणे गरजेचे आहे, अन्यथा पृथ्वी क्षणार्धात नाहीशी होऊ शकते. आज डिजीटल क्रांतीचा युग आहे, असे आपण म्हणतो परंतू यामुळे आपण निसर्गापासून दुर चाललो आहोत हे तितकेच खरे आहे, म्हणून पर्यावरणपूरक क्रांती झाली पाहिजे अन्यथा मानव व सजिवसृष्टी नष्ट झाल्याशिवाय राहु शकत नाही.

विवाहप्रसंगी वर किंवा वधुला तिच्या आई वडीलांकडून प्राप्त होणारी संपत्ती म्हणजे हुंडा होय. कुटूंब पद्धतीतून पुढे आलेली हुंडा ही एक संकल्पना आहे. हुंडा पद्धतीमुळे स्त्रीयांना कुटूंबात दुय्यम स्थान दिले गेले आहे. 2011 ते 2014 या तीन वर्षाच्या काळात 25242 महिला हुंड्याांच्या बळी ठरल्या आहेत. तर याच काळात महाराष्ट्रात 1161 महिला बळी ठरल्या आहेत. त्यामुळे ते सुद्धा एक आव्हान आहे. बालविवाह हा सुद्धा यातूनच निर्माण झालेली समस्या आहे. समाजामध्ये गरीब व श्रीमंती ही दरी वरच्यावर वाढत चाललेली आहे. गरीब अतिगरीब तर श्रीमंत हे अतिश्रीमंत होत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य समाजाला आपल्या मुलभूत गरजासुद्धा व्यवस्थितपणे सोडवता येत नाही. शिक्षण, आरोग्य हे सुद्धा आज खर्चिक झालेले आहेत. ग्रामीण समाजाला अजूनही रस्ते, विज आणि पाणी या गरजांसाठीच संघर्ष करावा लागत आहे ही आपल्या देशाची शोकांतीका आहे. खाजगीकरण, जागतिकरण आणि उदारीकरणामुळे भारतातील शेती व शेतीशी निगडीत व्यवसाय व उद्योगधंदे यांचे कंबरडे मोडले आहे. अतिरिक्त उत्पादनासाठी शेतीत मोठ्या प्रमाणात रासायनिक खतांचा वापर केला जात आहे. त्यामुळे माती आणि पाणी प्रदुषीत

होऊन त्यांचे परिणाम मानवावर होऊन आरोग्य धोक्यात येऊ लागले आहे. जमिनीतील कार्बनचे प्रमाण कमी होऊन ते हवेमध्ये वाढत आहे. त्यामुळे शुध्द ऑक्सीजनची कमतरता भासत आहे. त्याचप्रमाणे आज चंगळवादामुळे व धकाधकीच्या जिवनामुळे माणूस एकमेकापासून दुरावत चाललेला आहे. त्याचा परिणाम म्हणजे कौटुंबिक विघटन हे आहे.

माणसाच्या शारिरीक, मानसिक आणि अध्यात्मिक उत्कृष्टतेचा सर्वांगिण विकास म्हणजे शिक्षण होय असे महात्मा गांधी म्हणतात. व्यक्तिच्या नैसर्गिक प्रवृत्तीचा विकास म्हणजे शिक्षण होय असे रुसो म्हणतो. परंतू आजही ग्रामीण भागत शिक्षणाला शेवटचा प्राधान्यक्रम दिला जातो. त्यामुळे सामाजिक समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त ठरणारे शिक्षण हे ग्रामीण समाजात गळतीच्या समस्या अडकुन पडलेले आहेत. त्याचे कारण म्हणजे वाढते बेरोजगारी व बेकारी ही समस्या आहे. कुपोषण ही ग्रामीण व आदिवासी समाजातील महत्त्वाची समस्या आहे. त्यांचे कारण अज्ञान आणि दारिद्रय हे आहे. यामुळे नागरिकरण मोठ्याा प्रमाणात होत आहे. नागरीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की, ज्या प्रक्रियेत ग्रामीण वसाहतीचे नागरी वसाहतीमध्ये रुपांतर होते. शहरामध्ये अनेक प्रकारच्या सोयीसुविधा असतात. रोजगार असतो, त्यामुळे ग्रामीण भागचे शहरी भागात स्थलांतर होत आहे. अपुरे शिक्षण, अज्ञान आणि बेरोजगारीमुळे पुन्हा नागरीक गुन्हेगारीकडे वळतात त्याचे कारण परिस्थिती आणि दारिद्रय आहे. कोणालाही गुन्हा करावा वाटत नाही परंतू मानवाला परिस्थिती तशी बनवते. दारिद्रय, बेकारी, गुन्हेगारी, प्रवृत्तीतून व गरजेतून पुन्हा वेश्या व्यवसायासारखे प्रश्न निर्माण होतात. ग्रामीण भागातील लोकांचे शहराकडे स्थलांतर होत असल्यामुळे झोपडपट्टी ही शहरातील नविन समस्या निर्माण होत आहे. या परिस्थितीला तोंड देऊन ती सोडविण्या ऐवजी लोकप्रतिनिधी व सरकारी अधिकारी भ्रष्टाचारात गुंतलेली आहे. त्यामुळे भ्रष्टाचार ही नविन समस्या निर्माण होत आहे. भ्रष्टाचार उखडून काढल्याशिवाय सामाजिक समस्येवर मात करता येणार नाही. त्यामुळे लोकांची तशी मानसिकता तयार करणे व कायदे करुन त्यांची अंमलबजावणी करणे गरजेचं आहे. त्याशिवाय अव्हानांना प्रतिसाद देऊ शकत नाही आणि मानवी समाजाचा विकास होणार नाही.

**उपाय योजना**

१. शेतीपूरक रोजगार निर्माण करणे.

२. आर्थिकस्तर उंचावण्यासाठी मुलभूत सोयीसुविधा देणे.

३. कायदे करणे व जनजागृती करणे.

४. शिक्षणाचा प्रचार, प्रसार करणे आणि गळती रोखणे.

५. द्रारिद्रय निर्मुलनासाठी सामुहिक प्रयत्न करणे.

६. पर्यावरणपूरक विकास करणे.

७. अनिष्ठ प्रथेचे निर्मुलन करणे.

८. रॅली, संवाद, चर्चासत्रे व परिषदा आयोजीत करणे.

९. सामाजिकशास्त्रात व्यवसायिक व उद्योगी रोजगाराभिमुख अभ्यासक्रम तयार करणे.

**सारांश**

थोडक्यात ''एकमेकास सहाय्य करु अवघे धरु सुपंथ'' यानुसार सामाजिक शास्त्रे जर प्रश्नांवर आधारीत आव्हानांना तोंड देण्यासाठी परस्पर पुरक भूमिका घेत असतील तर निश्चितच मानवाचा विकास होईल आणि सामाजिकशास्त्रां समोरील असलेल अनेक आव्हाने सहज पार करुन मानवी जीवन सुखी व संपन्न बनेल. आंतरज्ञानशाखीय दष्टीकोनातून अभ्यास केला तर सामाजिक शास्त्रांसमोरील व समाजासमोरील असलेले अनेक आव्हाने व समस्या सहज सुटू शकतील आणि समाज हा सुसंपन्न बनेल.

**संदर्भ**

१. प्रा.गोरे अशोक, ग्रामीण व नागरी समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, औरंगाबाद, 2014, पृ.क्र.
२. डॉ.देव प्रभाकर, इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड, 1997, पृ.क्र.
३. डॉ.खैरनार दिलीप, समाजशास्त्र परिचय, डायमंड प्रकाशन, पुणे, 2008
४. प्रा.शेख गफुर, इतिहास लेखन शास्त्र, प्रितम प्रकाशन, जळगाव, 2007
५. डॉ.काचोळे दा.धों.,ग्रामीण नागरी प्रश्न आणि समस्या, कैलास प्रकाशन, औरंगाबाद, 2014
६. डॉ.शिंदे एस.पी.,इतिहास लेखनशास्त्र, एज्युकेशन प्रकाशन, औरंगाबाद, 2015,
७. डॉ.मोरवंचीकर रा.श्री., इतिहास लेखनशास्त्र व इतिहासकार, विद्या प्रकाशन, औरंगाबाद, 1999
८. डॉ.गाठाळ एस.एस.,इतिहासाचे तत्वज्ञान, कैलास प्रकाशन, औरंगाबाद, 2005
९. वर्तमान पत्रे
१०. वेबसाईट

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S
**RESEARCH JOURNEY**
UGC Approved Multidiciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL
23 March 2019, Special Issue- 168 (II)

# Globalisation : Challenges and Opportunities for India

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Dr. Shivaji Dalnar
Principal
Punyashlok Ahilyadevi Holkar Mahavidyalaya,
Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

**Co-Editor**
Dr. Bonnar R.Y.
Dept. of Economics
PAH Mahavidyalaya, Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

Prof. Sonner V.B.
Dept. of Political Science
PAH Mahavidyalaya, Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

RESEARCH JOURNEY

| RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | | ISSN- 2348-7143 |
| --- | --- | --- |
| Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (II) Agriculture & Water Management in Historical Period in India | March 2019 | UGC Approved No. 40705 |

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

**23rd March 2019 Special Issue- 168 (II)**

# Globalisation: Challenges and Opportunities for India

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of This Issue**
**Dr. Shivaji Dalnar**
**Principal**
Punyashlok Ahilyadevi Holkar Mahavidyalaya,
Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

**Co- Editor of This Issue**
**Dr. Bonnar R.Y.**
Dept. of Economics
PAH Mahavidyalaya, Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

**Prof. Sonner V.B.**
**Dept. of Political Science**
PAH Mahavidyalaya, Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (II) | March 2019 | UGC Approved No. 40705
Agriculture & Water Management in Historical Period in India


42. जागतिकीकरण आणि उच्च शिक्षण 127
प्रा. नरहीरे आर. जी.

43. जागतिकीकरण आणि भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने 129
प्रा.डॉ.राठोड शिवाजी लच्छिराम, प्रा.डॉ.शिंदे अनंत नामदेवराव

44. जागतिकीकरण व भारतीय शेती क्षेत्र 131
प्रा.मुसळे नवनाथ पंढरीनाथ

45. वैश्विकरण के परिप्रेक्ष्य में तुलसी का सामंजस्यवाद 133
डॉ. कल्पना सतीश कावळे

46. जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवर झालेला परिणाम 135
डॉ. वायभासे एस.व्ही.

47. **जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था** 137
प्राध्यापक . राजेश चिमणकर अर्थाशात्र विभाग प्रमुख

48. **जागतिकीकरणाचे भारतीय शेतीक्षेत्रावरील परिणाम** 139
**प्रा.राम गणपतराव शेवलीकर , प्रा.एम.बी. हळदेकर**

49. जागतिकीकरण व भारतीय शेती क्षेत्र 143
डॉ.विजय एच.नागरे

50. जागतिकीकरण आणि भटका समाज 147
प्रा.बोडके बालाजी रावसाहेब

51. **जागतिकीकरण आणि भारतीय स्त्रियांचा राजकारणातील सहभाग** 150
कु. विद्या चौरपगार

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (II) Agriculture & Water Management in Historical Period in India | March 2019 | UGC Approved No. 40705

# जागतिकीकरण आणि भटका समाज

**प्रा.बोडके बालाजी रावसाहेब**
इतिहास विभाग प्रमुख, सुंदरराव सोळंके महाविद्यालय,माजलगांव जि.बीड - 431131

---

जागतिकीकरण ही राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जीवनामधील जागतिक सहकार्य व समन्वय साधन्याची, सर्व लोकांना व्यवहारात आणि मानसिकदृष्ट्या एकत्र करण्याची प्रक्रिया आहे. जागतिकीकरणाचा विचार करतांना त्यांच्या आर्थिक परिणामांना सामान्यत: महत्व मिळत असले तरी जागतिकीकरणाच्या इतर बाजुही महत्वाच्या आहेत. प्राचीन काळापासुन भटके हे येथील मुलनिवासी आहेत. आर्यापूर्वी ते येथे होते. आर्यांनी त्यांच्यावर हल्ला करून त्यांना पराभूत केले. त्यावेळी येथील राना-वनात, जंगलात गेले आणि ते रानटी बनुन गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळले. आर्यकाळातच यांच्यात गुन्हेगारी प्रवृत्तीचा उगम झाला आणि तेराव्या शतकात विकास झाला. त्यानंतर ब्रिटीशांनी 1871 ला कायदाकरून त्यांच्या माथी गुन्हेगारीचा शिक्का मारला. स्वातंत्र्यानंतर 1960 च्या सोलापुर अधिवेशनापासून हा शिक्का पुसण्याचा प्रयत्न झाला. जागतिकीकरणामुळे लोक एकमेकांजवळ आले त्यांचे आचार-विचार, त्यांची संस्कृती, त्यांचे राहणीमान इ. गोष्टींची परस्परांना ओळख होवू लागली. त्यातून सोईस्कर बाबीचा परस्पराकडून स्विकार होवू लागला. त्यामुळे आचार-विचारात सुधारणा झाली. असे असले तरीही जागतिकीकरणाचा भटक्यांना मोठा फटकाही बसलेला आहे. बेरोजगार, शिक्षण, महागाई व रोगराई इ. समस्या त्यांच्यापुढे उभ्या टाकलेल्या आहेत. जागतिकीकरणामुळे स्पर्धा निर्माण झाली. जो समर्थ असतो तोच टिकतो आणि जो असमर्थ असतो त्यांना नष्ट व्हावे लागते किंवा गुलामीचे जिवन जगावे लागते. हजारो वर्षापासून प्रवाहापासून दुर असलेले भटके जगाशी कशी स्पर्धा करणार आणि समर्थ कसे बनणार हा प्रस्तुत शोध निबंधाचा मुख्य उद्देश असून त्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रस्तुत शोध निंबधासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला असुन शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग केला आहे. या त विविध संदर्भग्रंथ, पुस्तके, इंटरनेट व वृत्तपत्रे इ. वापर करून माहितीचे संकलन करण्यात आलेले आहे.

जागतिकीकरण म्हणजे काय? तर वस्तू०ु आणि सेवांच्या व्यापारात जलद वाढत आणि जागतिक बाजारपेठेचे निर्मिती म्हणजे जागतिकीकरण होय. असे असले तरी, खुली स्पर्धा प्रस्थापित करणे,व्यापार व उत्पादनावरील सरकारचे नियंत्रण रद्द करणे, सरकारी उपक्रमाचे खाजगीकरण करणे, आयातीवरील निर्बंध व प्रशुल्क रद्द करणे, शासनाकडुन देण्यात येणाऱ्या अनुदानात कपात करणे हे जागतिकीकरणाचे बंधने आहेत. रूसी मोदी यांच्या मते "नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून उत्पादनात वाढ करणे व त्या योगे खुल्या स्पर्धेस वाव देणे आणि जागतिक बाजारपेठेत त्याची विक्री करणे होय."[1] जर जागतिकीकरणामुळे सरकारी उपक्रमाचे खाजगीकरण आणि शासकीय अनुदानात कपात होत असेल तर आत्तापर्यंत भटका असलेल्या समाजाचा विकास कसा होणार हा प्रश्न उभा टाकतो. नाव सांगायला स्वत:चे गाव नाही. रहायला घर नाही. जमिनीसारखे कायम स्वरूपाचे उत्पन्नाचे साधन नाही. उपेक्षित जगणे नशिबी आल्यामुळे पोटभरण्यासाठी कामाच्या निमित्ताने, सतत गावोगाव भटकत असलेला आणि भिक्षेवर जगणारा अथवा परंपरेने चालत आलेल्या कलेच्या आधाराने स्वत:ची उपजिविका करणारा लोकसमुह म्हणजे भटका होय.[2] तर तो जागतिकीकरणात कसा काय समर्थ बनेल आणि जगाशी स्पर्धा करेल, त्यासाठी शासनाला त्यांना सर्वप्रथम सशक्त करावे लागेल. तरच त्यांचा टिकाव लागेल अन्यथा ते या व्यवस्थेचे गुलाम बनतील आणि अनेक समस्या त्यांच्यापुढे उभे राहतील.

कोणत्याही समाजाचे पैसा हे प्रतिष्ठेचे प्रतिक आहे. तसेच आजकालची दुनिया पैशावर चालते. पैशापुढे माणूस माथा झुकवितो, पैशाच्या बळावर अनेक उलथापालथी होतात. कारण पैसा हे व्यक्तीच्या, समाजाच्या विकासाचे एकमेव साधन आहे. पैशाअभावी विकास खुंटला जातो. भटका समाज हा तर एका ठिकाणी वस्ती करून राहत नसल्यामुळे आणि नागरी जिवन व्यवस्थीत जगता येत नसल्याने या जमाती मागासलेल्याच आहेत.[3] सतत भटकंतीमुळे त्यांना कायमस्वरूपाचे घर नाही, अर्थार्जनाचे साधन नाही. या समाजाने बनवलेल्या वस्तुला नागरी समाज योग्य किंमत सुध्दा देत नाही.[4] कारण जागतिकीकरणामुळे सुंबक व आकर्षक वस्तु मिळू लागली आहे. त्यामुळे या समाजाची आर्थिक कोंडी झाली. वडार समाज दगड काढून आपली उपजिविका भागवत असे, पण आता विटाचा वापर होत असल्यामुळे त्यांचा पारंपारिक व्यवसाय धोक्यात आला आहे. भटके-विमुक्ताचा व्यापाराबरोबरच पशुपालन हा व्यवसाय आहे. पण आजच्या दुषित हवामानामुळे रोगांचा प्रार्दुभाव व वाढत्या औषधांच्या किमती तसेच गायराणही शिल्लक राहिले नाहीत. त्यामुळे हा व्यवसाय धोक्यात आलेला आहे. पोटाची भुक भागवण्यासाठी कसलाही व्यवसाय करावा लागतो. करमणुकीचे खेळ करणे, गारूडी, दरवेशी, डवरी, कोल्हाटी, नंदीवाले व बहुरूपी इ. व्यवसाय आहेत पण टि.व्ही., इंटरनेट, मोबाईलमुळे समाजात उत्सुकता राहिली नाही. जग बदलत आहे त्याचा शिकार हा समाज होत आहे. यासमाजाला आर्थिक विकासासाठी इच्छा असुनही बँका उद्योगधंद्यासाठी कर्ज देत नाही. कारण व्यवसायाच्या आधुनिकीकरणामुळे आणि कारखानदारीमुळे पारंपारिक कुटील उद्योगांना वाव राहिला नाही.[5] त्यामुळे या समाजाची

"धर्माला कुत्र आढव" अशी अवस्था निर्माण झाली. त्यामुळे दैनंदिन गरजा पुर्ण करण्यासाठी परिस्थीती चोरी करायला लावते आणि भाकरीसाठी त्यांना गुन्हेगार बनावे लागते हि त्यांची जागतिकीरणातील आर्थिक समस्या आहे.

भटक्यांमध्ये हजारोवर्षांपासून मनीमानसी रूजलेल्या अंधश्रध्दा संपविणे सोपे नाही. त्यांचे भटके जिवन संपवायचे असेल तर त्यांच्या सामाजिक समस्या संपल्या पाहिजेत. जातीभेद हा समाजाला लागलेला कलंक आहे. लक्ष्मण मानेचा स्पर्श पाण्याच्या पिपाला झाला, त्यावेळी म्हातारी म्हणाली "आर आर मुडद्या बाटीवलस का पाणी आता? तुझ मडं प्यावं का? "[6] यावरून जातीतील अंतर दिसून येते. सुशिक्षित आणि उच्चवर्णिय समाजात त्यांना स्थान नाही. पुर्वीतर पाटलांकडे नोंद करावी लागत असे. त्यामुळे त्यांना पोटासाठी चोरी करावी लागत असे. लक्ष्मण गायकवाड म्हणतात, " आम्हाला काम-धंदा कोणी देत नाही म्हणुन चोरी करावी लागली तर सबंध जातीलाच चोर समजतात असं का? "[7] त्यांचे सामाजिक जिवन द्रारिद्रयाने गांजलेले आहे. समाज अज्ञानी असल्याने व नागरी सबंध नसल्याने कुटूंब नियोजनाचे महत्व पटलेले नाही. सामाजिक जिवन भयप्रद आहे. त्यांचे जिवन म्हणजे छळाची गाथा आहे. यांच्यात अटीतटीची भाऊबंदकी असल्यामुळे भांडणे होतात. त्यांचा निकाल जात पंचायतीत पंच देतात. भटकंतीमुळे त्यांना अशुध्द पाणी, दुषित हवामान व अस्वच्छ राहणीमान यामुळे ते रोगाचे बळी पडतात. त्यांची बोलण्याची पध्दत व भाषा उग्र असते. त्यामुळे लोकांना त्यांच्याविषयी आपुलकीऐवजी तिरस्काराची भावना निर्माण होते. अशा भटक्या विमुक्तांच्या जागतिकीकरणातील समस्या आहेत.

प्रामुख्याने हा समाज राजकारणात पडायला घाबरतो. लक्ष्मण माने म्हणतात, " निवडणुकीत तर आम्ही कोणी गावातच ऱ्हात नाय, आमची माणसं मताला जात नायत, आम्ही नोंदवत बी न्हाय, मत नकू, मेंबर नकू, अन मारामारी बी नकू म्हणून निवडणुकी दिवशी फारच उठून रानूमाळ निघून जात."[8] त्यांच्यात एकमत नाही, नेतृत्व नाही, संघटन नाही. त्यामुळे त्यांचे प्रश्न सुटणे अवघड आहे. भटक्या विमुक्तांच्या राजकीय नेत्याला आर्थिक समस्येला तोंड द्यावे लागते. शेवटी पराभव स्विकारावा लागतो, मागासवर्गीया प्रमाणे भटक्या-विमुक्त जाती-जमातीसाठी राखीव मतदार संघाची स्वतंत्र सोय नाही. त्यामुळे त्यांना जनरल मतदार संघातून निवडून येणे अवघड होते. राजकारणाचे डावपेच,वकृत्वकला व भाषेमुळे तो पराभूत होत असतो. हि जागतिकीकरणातील भटक्यांची राजकीय समस्या आहे.

शिकणे म्हणजे ज्ञानसाधना करणे, शिक्षणाशिवाय सर्वांगीण विकास होणार नाही. हा समाज तर भटका आहे. शिक्षणापासुन वंचित आहे. आज महागाईमुळे फिस व प्रवासखर्चात मोठी वाढ झोलेली आहे. त्यामुळे शिक्षण घेणे आवाक्या बाहेरचे झाले. यांच्या पोटाचाच प्रश्न सुटलेला नसतो. त्यामुळे ते शिक्षणाला दुय्यम स्थान देतात. मुख्यत: शिक्षणापासून वंचित राहिल्याने विकासाचे मार्ग अडचणीचे झालेले आहेत.या समाजात बालविवाहाची प्रथा रूढ आहे. त्यामुळेही शिक्षणाकडे दुर्लक्ष होत असते. वाघमोडे म्हणतात की " घरच्यांनी सेवट ठरवलं, आता बळजबरी करूनच येचं लगीन करायचं, त्यासिवाय येच्या अंगातल साळचं भूत सुटायच न्हाय. आवानी मामाला निरूप दिला. सोयरं पोराच लगीन करून टाकूया याच लगीन सराईत."[9] यावरून शिक्षणापेक्षा लग्नाला महत्व दिल्याचे दिसते त्यामुळे अंधश्रध्दा,अज्ञान व दारिद्-य ह्या समस्या निर्माण झाल्या आहेत, महागडे शिक्षण, इंग्रजी शाळा, खर्चीक उच्च शिक्षण, खाजगीकरण, रोजगाराच्या संधीचा अभाव यामुळे जागतिकीकरणात भटक्यांपुढील वरील शैक्षणिक समस्या निर्माण झालेल्या आहेत.

भटक्यांना कलेचे आगार समजले जाते. पण चित्रपट जमान्यामुळे त्यांच्या कलागुणांवर फारमोठे गडांतर आले आहे. त्यांच्यासाठी स्वतंत्र व्यासपीठ नाही. त्यामुळे त्यांच्या कलागुणांचा विकास होत नाही. त्यांची कला हीच पोटभरण्याचे साधन होते. पण जागतिकीकरणामुळेतेही हिरावून घेतले आहे. तमाशा, कोल्हाटी, गारूडी, नंदीवाले, दरवेशी, कैकाडी इ. भटक्यांचे साधन होते. पोटभरण्याचे साधन म्हणजे प्राणी तेही आधुनिकीकरणामुळे नाहीसे होवू लागले आणि जागतिकीकीणात भटक्यांपुढे अशी सांस्कृतिक समस्या उभी टाकली आहे. थोडक्यात जागतिकीकरणामुळे भटक्या समाजापुढे अनेक समस्या निर्माण झोलेल्या आहेत. पारंपारिक व्यवसाय वुडीत झाल्यामुळे नविन व्यवसाय स्विकारावा लागत आहे. पण नविन व्यवसाय म्हटले की, पैसा येतो, साधने येतात आणि यांच्याकडे तर पैसा नाही व साधनही नाही त्यामुळे त्यांच्यापुढे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक समस्या निर्माण झालेली आहे.

*** उपाय योजना :**

जागतिकीकरणात भटक्यांना टिकवायचे असेल तर अनेक उपयायोजना करावी लागतील. अतिरिक्त जमीन शासनाने भटक्या विमुक्तांना दिल्यास स्थिर स्वरूपाचे साधने मिळेल शासनाच्या सोयी-सवलतीचा लाभ करून देणे, व्यापारी व्यवसायाचे शिक्षण दिल्यास त्यात त्यांची फसगत होनार नाही. त्यांना जोड व्यवसाय उपलब्ध करून दिला पाहिजे. त्यासाठी महामंडळ स्थापन करून, कर्ज उपलब्ध करून दिले पाहिजे. हजारो वर्षापासून फ़ोपावलेल्या जाती-भेदांचा वृक्ष शासनाने कडक कायदा करून, समुळ उपटून टाकला पाहिजे. तो चोरी का करतो त्यांचे संशोधन करून त्यांच्या गरजांची शासनाने पुर्तता करावी. अंधश्रध्दा निर्मुलन समितीने त्यांच्यात जनजागृती करावी. शासनाने कुटूंबनियोजनाचें महत्व पटवून द्यावे. शासनाने रोजगार, शिक्षण व आरोग्य सेवा यांची पुर्तता एकाच ठिकाणी करावी. त्यांची लोकसंख्या ठरवावी त्यानुसार त्यांना राजकीय प्रतिनिधीत्व देण्यात यावे. मागासवर्गीयांप्रमाणे त्यांच्यासाठीही स्वतंत्र् मतदार संघाची सोय करावी. शिक्षणातील गळतीचे प्रमाण रोखावे व त्यासाठी व्यवसायिक शिक्षणावर भर देण्यात यावा. कपडे, जेवन व शिष्यवृत्ती देण्यात यावी तरच ते स्वावलंबी बनतील. कलावंतासाठी स्वतंत्र व्यासपीठ असावे आणि ते प्रसारमाध्यमाद्वारे प्रसारित करावे.

अशा उपाययोजना केल्यातरच ते जागतिकीकरणात थोडे-फार टिकाव धरू शकतील. अन्यथा भयान प्रश्न निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. कार्ल मार्क्स म्हणतो की, ज्यांच्याकडे उत्पादनाच्या साधनाची मालकी आहे, असा आहेरे आणि ज्यांच्याकडे उत्पादनाच्या साधनाची मालकी नाही असा नाहिरे वर्ग. जागतिकीकरणामुळे यांच्यात संघर्ष वाढत चाललेला आहे. गरिब अतिगरीब, श्रीमंत अतिश्रीमंत होताना दिसून येत आहे. जागतिकीकरणाचा परिणाम जल,जंगल आणि जमिनीवर झाल्यामुळे भटक्यांचा पारंपारिक व्यवसाय उध्वस्त होऊन नविन अनेक समस्या पुढे येताना दिसून येत आहेत. वेळीच यावर विचार मंथन होणे आवश्यक आहे. जर भारताला महासत्ता बनायचे असेल तर देशातील कोणताही घटक दुर्लक्षित असून चालणार नाही. त्यामुळे भटक्या समाजाकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. अन्यथा भारत महासत्ता बनणार नाही यासाठी समस्यांची उकल होणे व त्यांच्यावर उपाय करणे हे गरजेचे आहे. त्याशिवाय ते जागतिकीकरणात टिकू शकणार नाहीत.

**संदर्भ :**

1) प्रा.मोरे दिनेश, पहिल्या महायुद्धानंतरचे जग, के.एस.प्रकाशन, पुणे,2008, पृ.क्र.237
2) डॉ.कदम नागनाथ धों., महाराष्ट्रातील भटका समाज : संस्कृती व साहित्य, प्रतिमा प्रकाशन,पुणे, 1995, पृ.क्र.12
3) राठोड मोतीराम, भटक्या विमुक्तांचा जाहिरनामा, एम.आर.प्रकाशन, औरंगाबाद, 1998, पृ.क्र.88
4) उपरोक्त पृ.क्र.127
5) चव्हाण रामनाथ, भटक्या विमुक्तांचे अंतरंग, भटक्यांच्या तांड्यावरून भटकताना, सुगावा प्रकाशन, पुणे, 1998,पृ.क्र.10
6) माने लक्ष्मण, उपरा, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, 1980, पृ.क्र.80
7) गायकवाड लक्ष्मण, उचल्या, श्री विद्या प्रकाशन, पुणे, 1987 पृ.क्र.50
8) माने लक्ष्मण, पावला वरचं जग, श्री विद्या प्रकाशन, पुणे 1990 पृ.क्र.71
9) वाघमोडे गुलाव, रानभैरी, वनश्री प्रकाशन, पुणे, 1986, पृ.क्र.140
10) डॉ.पवार रूक्मीनी, बंजारा लोकजीवन पध्दती, कैलास प्रकाशन, औरंगाबाद, 2005
11) माने लक्ष्मण, भटक्याच भारूड, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, 2003
12) चव्हाण रामनाथ, भटक्यांची जात पंचायत

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

2nd March 2019 Special Issue- 147 (I)

# Agriculture & Water Management in Historical Period in India

**Chief Editor**
**Dr. Dhanraj T. Dhangar**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
**Dr. Kshirsagar O.M.**
**Principal**
Kai. Bapusaheb Patil Ekambekar Mahavidyalaya,
Udgir, Dist. Latur-(M.S) - 413517

**Co- Editor of This Issue**
**Dr. Shinde A.N.**
HOD, Dept. of History,
Kai. Bapusaheb Patil Ekambekar Mahavidyalaya,
Udgir, Dist. Latur-(M.S) – 413517

**Assist.Prof. Patil J.J.**
Dept. of History,
Kai. Bapusaheb Patil Ekambekar Mahavidyalaya,
Udgir, Dist. Latur-(M.S) – 413517

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 147 (I) Agriculture & Water Management in Historical Period in India | March 2019 | UGC Approved No. 40705

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

**2nd March 2019 Special Issue- 147 (I)**

# Agriculture & Water Management in Historical Period in India

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of This Issue**
**Dr. Kshirsagar O.M.**
**Principal**
Kai. Bapusaheb Patil Ekambekar Mahavidyalaya,
Udgir, Dist. Latur-(M.S) - 413517

**Co- Editor of This Issue**
**Dr. Shinde A.N.**
HOD, Dept. of History,
Kai. Bapusaheb Patil Ekambekar Mahavidyalaya,
Udgir, Dist. Latur-(M.S) – 413517

**Prof. Patil J.J.**
Dept. of History,
Kai. Bapusaheb Patil Ekambekar Mahavidyalaya,
Udgir, Dist. Latur-(M.S) – 413517

20. छत्रपती शाहू महाराजांचे शेती सुधारणा विषयक धोरण 61
**प्रा.डॉ.आर.एम.साळुंके**

21. डॉ. बाबासाहेब आंबेडकर-भारतीय जलनीतीचे शिल्पकार 63
**प्रा. राजभोज संदिप बाबासाहेब**

22. राष्ट्रकूट कालीन कंधार येथील जलस्थापत्य आणि जलव्यवस्थापन **66**
**डॉ. अनिल कठारे**

23. जलसाक्षरता काळाची गरज 69
**डॉ. बबन पवार, डॉ. रामभाऊ मुटकुळे**

24. ऐतिहासिक काळातील कृषी व जल व्यवस्थापन 71
**प्रा. डॉ. सखाराम वाघमारे, डॉ. अरुण दळवे**

25. जलसंवर्धनाची चळवळ काळाची गरज 74
**डॉ.शारदा गोविंदराव बंडे**

26. "जलव्यवस्थापनातून महासत्तेकडे" 76
**प्रा.चव्हाण प्रमोद लक्ष्मणराव**

27. निजामकालीन कृषीसमस्या — विशेषत : मराठवाडा 78
**डॉ. दामाजीवाले.एम.डी**

28. राजर्षी शाहू महाराजांचे जलव्यवस्थापन: एक ऐतिहासिक कार्य 80
**प्रा.अनिल जामकर**

29. मध्यकाळातील जल व्यवस्थापनाचा ऐतिहासक अभ्यास 82
**प्रा. डॉ. रामभाऊ देवराव काशिद**

30. मराठवाड्यात शेती करताना दुष्काळावर मात करण्याचे मार्ग शोधणे . 84
**प्रा. डॉ. ढोणे कुसूम बाबराव**

31. जलसाक्षरता काळाची गरज 87
**प्रा. पावडे खोब्राजी वामनराव**

32. जल आणि संस्कृती : एक ऐतिहासीक अभ्यास 89
**प्रा. चाटे राजकुमार ज्ञानोबा**

33. छ. शिवाजी महाराजांचे किल्ल्यावरील जलव्यवस्थापन व जलसंवर्धन 91
**प्रा. बोडके बालाजी रावसाहेब**

34. जलव्यवस्थापनातील स्थापत्य : बारव 94
**प्रा. डॉ. विजया साखरे**

35. "शिवाजी महाराजांचे कृषीविषयक धोरण" 96
**डॉ.कऱ्हाळे उत्तम सिताराम**

36. छत्रपती शिवरायांचे शेती व जलधोरण 98
**प्रा.डॉ.प्रकाश संभाजी वाघमारे**

37. पेशवेकालीन पाणीपुरवठा यंत्रणा (अठरावे शतक) 101
**प्रा. डॉ. सुनिता शंकरराव कुरूडे**

38. राजर्षी शाहू महाराजांचे जलव्यवस्थापन 104
**प्रा. अनिता व्यंकटराव शिंदे**

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 147 (I) Agriculture & Water Management in Historical Period in India | March 2019 | UGC Approved No. 40705

# छ. शिवाजी महाराजांचे किल्ल्यावरील जलव्यवस्थापन व जलसंवर्धन

**प्रा. बोडके बालाजी रावसाहेब**
इतिहास विभाग प्रमुख , सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव

---

**प्रस्तावना :—**

छत्रपती शिवाजी महाराज हे भारतीय इतिहासातच नव्हे तर जगाच्या इतिहासातील एक अलौकिक व्यक्तीमत्व होते. वयाच्या सोळाव्या वर्षी स्वराज्याची स्थापना केली व काही काळातच स्वराज्याचे रुपांतर महाराजांनी सुराज्यात केले. स्वराज्यासाठी व सुराज्यासाठी महाराजांना अनेक निष्ठावान कर्तृत्ववान मावळ्याचे सहकार्य लाभले, त्याचप्रमाणे भौगोलिक, पर्यावरणीय, आर्थिक, सामाजीक, धार्मिक इत्यादी घटकांचे सहकार्य लाभले. आज संपूर्ण जगापूढे पर्यावरणाचे जतन व संवर्धन करणे ही फार मोठी समस्या आहे. पर्यावरणात तीन घटक येता त्यात जलावरण, शिलावरण व वातावरण. या तीन घटकांचा अभ्यास महाराजांनी केले. किल्ल्यावर वनसंपत्तीचे संरक्षण व संवर्धन केले त्यामुळे ढग मोठया प्रमाणात अडवले जाउन पाणी उपलब्ध झाले. आज सरकार जलसंवर्धन व जलव्यवस्थापनाचे महत्व सांगु लागले आहे परंतु महाराजांनी सतराव्या शतकात ते वास्तवात आणले. जलव्यवस्थापन, वनसंवर्धन, जलसंवर्धन व पाणी आडवा आणि पाणी जिरवा याकडे विशेष लक्ष दिले म्हणुन त्यांना पाणी किल्यावरही मुबलक प्रमाणात उपलब्ध करता आले. प्रस्तुत शोधनिंबधात महाराजांनी जलव्यवस्थापन व जलसंवर्धन कशाप्रकारे केले याचा आढावा घेण्यात येणार आहे.

**शोधनिंबधाची उद्धिष्टे :—**

1. शिवकालीन जलव्यवस्थापनाचा अभ्यास करणे.
2. शिवकालीन किल्ल्यावरील जलव्यवस्थापनाचा व जलसंवर्धनाचा अभ्यास करणे.
3. जलव्यवस्थापन व जलसंर्धनासाठी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

**शोधनिंबधाची गृहितके :—**

1. छ.शिवाजी महाराजांचे जलव्यवस्थापन उत्कृष्ट होते.
2. छ.शिवाजी महाराजांनी किल्ल्यावर पाण्याचे जलव्यवस्थापन व जलसंवर्धन केले.
3. किल्ल्यावर शाश्वत पाण्यासाठी वेगवेगळे उपकम हाती घेतले.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत शोधनिंबधासाठी ऐतिहासीक विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर करण्यात आलेला असून यासाठी प्राथमिक व व्दितीय साधनांचा आधार घेतलेला आहे. यात किल्ला संदर्भग्रंथ, मासीके व वर्तमानपत्रे इत्यादी साधनाचा वापर केला आहे. जलसंपदा ही पर्यावरणातील एक महत्वाची संपदा आहे. गृहमालिकेतील फक्त तीनच गृहावर पाण्याचे अस्तित्व आढळते त्यात मंगळ, गुरु व पृथ्वी. पृथ्वीवर इतर गृहापेक्षा पाणी मोठयाप्रमाणात आहे म्हणुन पृथ्वीला जलागृह असे म्हणतात. पृथ्वीचा 71 टक्के भाग पाण्याने व्यापलेला असून 29 टक्के भाग हा भुभागाने व्यापलेला आहे. पृथ्वीवरील एकुण पाण्यापैकी 97 टक्के हे समुद्राचे खारे पाणी आहे 2 टक्के बर्फाच्या स्वरुपात आहे तर 1 टक्का पाणी पिण्यास उपयुक्त आहे. पाण्याचा मुख्य स्त्रोत पर्जन्य आहे. नदी,सरोवरे,समुद्र,तळी ही व्दितीय स्त्रोत आहे. सुर्याच्या उष्णतेमुळे समुद्र,तळी,सरोवरे यांच्यातील पाण्याची वाफ होते. द्रवरुप पाण्याचे बाष्पात रुपांतर होते बाष्पयुक्त हावेचे तापमान कमी झाले आसता बाष्पाचे सुक्ष्म जलकनात रुपांतर होते व ढग निर्मिती होते. सांद्रीभवन झाल्यास पर्यन्यवृष्टीला सुरुवात होते अशाप्रकारे पृथ्वीवरील जलचक्र पुर्ण होते1.जॉन टॉड म्हणतो की, अंतरिक्षाच्या पार्श्वभूमीवर आपला जलगृह एखादया नीलमण्याप्रमाणे चकाकतो. आपल्या सौरमालेत पृथ्वीसारखा दुसरा सुंदर गृह नाही याचे कारण पृथ्वीवरील असलेल पाण्याचे अस्तीत्व आहे.2म्हणुन छत्रपती शिवाजी महाराजांनी पाण्याचे महत्व ओळखुन 17 व्या शतकात जलव्यवस्थापन व जलसंवर्धनाचे धोरण राबवले.

आज पाउस दुर्मीळ झाला आहे. मानवी संस्कृती विनाषाकडे वाटचाल करत आहे पण 17 व्या शतकात शिवाजी महाराजांनी पाण्यासाठी वृक्षाचे केलेले संवर्धन ही त्यांच्या पुरोगामित्वाचे साक्ष देते. भविष्याकडे पाहण्याची दुरदृष्टी दर्शविणारी ठरते त्यामुळे ते जंगलाची काळजी घेणारे राजे होते.3संत तुकाराम महाराजांनी म्हटले की, वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे हे धोरण शिवाजी महाराजांनी स्वराज्यात अमलात आणले. गडावर पाण्याचा वापर पिण्यासाठी, बांधकामासाठी, प्राण्यासाठी व इतर कामासाठी केला जात असे. एवढेच काय तर उन्हाळयात गडावरील पाणी गडाखाली गावांना पुरवले जात असे.4

कौटिल्यांने अर्थशास्त्र या ग्रंथात सप्तांग सिंध्दात सांगीतला त्यात किल्लाही राज्यांचा एक अंग समजलेला आहे. अज्ञापत्रातही रामचंद्रपंत अमात्यांनी किल्याचे म्हत्व सांगितले गडकोट म्हणजे राज्य लक्ष्मी संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग असे म्हणाले. गड, कोट व दुर्ग हे किल्याचे मुख्य प्रकार आहेत. डोंगरावरील गड, जमीनीवरील कोट, समुद्रातील दुर्ग, जंगलातील वनदुर्ग व सपाट प्रदेशावरील स्थलदुर्ग असे किल्ल्याचे प्रकार आहेत. छ.शिवाजी महाराजांनी 362 किल्ल्यापैकी 111 किल्ले नवीन बांधले.5यातुन शिवाजी महाराजांची दुरदृष्टी दिसुन येते महाराजांनी फक्त किल्लेच बांधले नाहीत तर किल्ल्यावर अन्नधान्याबरोबरच पाण्याचेही योग्य नियोजन केले.

शिवाजी महाराजांच्या प्रत्येक किल्ल्यावर आपणास उत्कृष्ट पाण्याचे जलव्यस्थापन आढळते. किल्ल्यावरील पाण्याचे नियोजन व पाणी पुरवठयाला त्यांनी महत्व दिले. गडावर उदकपाहुन किल्ला बांधने आधी खडक फोडुन पर्जन्य काळापर्यंत संपुर्ण गडास पाणी पुरेल अशी मजबुत बांधनी गडाचे पाणी जतन करु राखावे.6यावरुन जलसंर्धन व जलव्यवस्थापनाचे नियोजन दिसुन येते.

किल्ल्याच्या एकदंरीत व्यवस्थेमधील पाणीपुरवठा हा महत्वाचा भाग होता. किल्ल्याचे दरवाजे बंध केल्यानंतर त्याचा बाहय जगाशी असलेला सबंध बंद होत असे. शत्रुने वेढा घातल्यास दिर्घकाळ किल्ला लढवावा लागेल त्यामुळे इतर रसदेसोबत पाणीपुरवठयाची सोय महत्वाची होती. पाणी पुरेशा प्रमाणात आहे की नाही याची खात्री करुनच किल्ला बांधला जाईल. किल्यामध्ये पाण्यासाठी तलाव , हौद, टाकी व तळी खोदले जात. शिवकाळात सर्वच किल्ल्यावर बारमाही पाण्याचा मुबलक साठा दिसुन येतो. रायगड किल्ल्यावरील गंगासागर तलावात पाणी वर्षभर मुबलक असे. शिबंदीसाठी याच तलावातील पाण्याचा वापर केला जात असे.7

पावसाचे पाणी साठविण्यासाठी किल्ल्यावर खडक खोदला जाई त्यातील दगड बांधकामासाठी वापरला जात असे व खदंकाच्या ठिकाणी तलावाची निर्मीती केली जात असे. त्या तलावातील पाणी किल्यावरील टाक्यात व डोंगरी किल्ल्याला पुरवठा केला जाई.8

छत्रपती शिवाजी महाराजांना पाण्याचे नियोजन मालोजीराजे भोसले यांच्याकडुन मिळाले. मालोजीराजे भोसले यांचे कुलदैवत शिखर शिंगणापुरचा शंभुमहादेव हे एका डोंगरावर आहे. याठिकाणी पाण्याची व्यवस्था नव्हती तेव्हा मालोजीराजेनी येथे एक तलाव बांधुन पाण्याची सोय करुन दिली. वेरुळ येथील घृष्णेश्वरांच्या मंदिराजवळ एक उत्तम पाण्याची विहीर बांधली.9 हेच पाण्यासासबंधी धोरण स्वराज्यामध्ये नियोजनबध्द राबवले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात थोरला दुष्काळ पडलेला होता म्हणुन 1648 मध्ये खेड तालुक्यातील शिवपुर येथील शिवगंगा नदीवर धरण बांधले.

रायगड किल्ल्याची निर्मिती छ.शिवाजी महाराजांचा अभियंता हिरोजी इंदुलकर यांनी केली. किल्ल्यावर खडक फोडणे तेथील दगड बांधकामासाठी वापरणे त्या ठिकाणी हौद,तलाव,विहीर,तळी व कोरडया तलावाची निर्मिती करणे हे धोरण राबवले म्हणजेच पाणी आडवणे व जिरवणे हे धोरण राबवले त्यामुळे पाणी विपुल प्रमाणात उपलब्ध झाले यावरुन महाराजांची जलपुनर्भरणाची संकल्पना दिसुन येते.रायगड किल्ल्यावर तळयाकरीता 20,000 हजार होन खर्च शिवाजी महाराजांनी केले.10रायगड किल्ल्यावर महादरवाज्यातुन पुढे आल्यावर जो तलाव दिसतो तो हत्ती तलाव आहे. हत्तीच्या स्नानासाठी व पिण्यासाठी या तलावाचा उपयोग केला जाई. हत्तीतलावापासून पुढे गेल्यानंतर धर्मशाळेपासुन दक्षिणेकडे गंगासागर तलाव आहे. महाराजांच्या राज्यभिषेकानंतर सप्तसागर व महानदयांची आणलेली तिर्थे या तलावात टाकले गेले त्यामुळे या तलावाला गंगासागर तलाव असे म्हटले जाते. पुढे कुशावर्त तलाव, ब्राम्हणतळे, टाक्या व विहीरींची निर्मिती केली आजही तिथे पाण्याचा साठा मोठयाप्रमात उपलब्ध आहे.

पन्हाळा या किल्ल्यावर मुबलक प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध करण्यात आलेला आहे. 4 तलाव 106 विहीरी या किल्ल्यावर आहेत. पन्हाळ गडावर उपलब्ध असलेल्या पाणीसाठयापैकी नागझरी येथी पाणीसाठा स्वच्छ व बारमाही आहे. झ–याच्या तिन्ही बाजुस दगडी चौथरे आहेत व दगडाच्या चौकातुन पाणी दगडी तोटीने पुढे आणले आहे याचे संपुर्ण बांधकाम पिंडाकृती असुन दाउत उकाने हा झरा बांधल्याचे सांगितले जाते.11

छत्रपती शिवाजी महाराजांना डॉ. एस.एन.सेन यांनी भारतीय नौदलाचे जनक असे म्हटले कारण महाराजांनी समुद्रपर्यटन करणे हे धर्मानुसार निषिध्द असतांना समुद्रात किल्ल्याची निर्मिती केली त्यात सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, स्वर्णदुर्ग, पदमदुर्ग, खांदेरी, कनकदुर्ग व रत्नदुर्ग असे किल्ले बांधले आणि धार्मीक अंधश्रध्देला मुठमाती देउन आरमार उभारले. एवढेच करन थांबले नाहीत तर समुद्रातील किल्ल्यावरही पाण्याचे योग्य व्यवस्थापन केले. समुद्रातील किल्ल्यापैकी सिधुदुर्ग किल्ला हा महाराजांनी बांधला व तिथे पाण्याचे व्यवस्थापन उत्कृष्ट केले. सिधुदुर्ग हा किल्ला महाराजांनी तीन वर्षात बांधला या किल्ल्याच्या बांधणीसाठी महाराजांनी पोतुर्गीज तंत्रज्ञाची मदत घेतली होती.12या किल्याचा परीसर 48 एक्कर असुन तीन किलोमिटरचा परीघ आहे. 52 बुरुज 9 मिटर उंचीची व साडेतीन मिटर रुंदीची तटबंदी आहे. पाचखंडी शिसे पायाभरणीसाठी ओतले गेले किल्यात गोडया पाण्याच्या तीन विहीरी आहेत. या विहीरीचे पाणी चविला अत्यंत गोड लागते त्यांची नावे दुधबाव, दहीबाव व साखरबाव असे आहेत किल्याच्या बाहेर खारे पाणी आणि आत गोड पाणी आहे. पाण्याचा अतिरीक्त साठा करण्यासाठी एक कोरडा तलाव बांधण्यात आला होता. 13

प्रतापगडावरही पाण्याचे योग्य नियोजन करण्यात आले होते. गडावरील पाणी वाया जावु नये म्हणुन उत्तरेच्या पुर्वीकडे दोन तळे बांधण्यात आले होते. या तलावातील पाण्याचा वापर पिण्यासाठी, बांधकामासाठी, प्राण्यासाठी व इतर कामासाठी केला जात असे यावरुन महाराजांनी शाश्वत पाणी धोरण राबवल्याचे दिसुन येते14 पुण्याजवळील सिंहगडावरही पाण्याचे सुनिश्चीत व्यवस्थापन केले होते. या किल्ल्यावरही तलाव, टाके व विहीर बांधलेले आहेत. त्यापैकी सिंहगडावरील देवटाके हे पिण्याच्या पाण्यासाठी वापरले जात असे व तेथील गोड, थंड पाणी प्रसिध्द होते. महात्मा गांधी पुण्याला असे त्यावेळी तेथील पाणी मागवत असे यावरुन शिवाजी महाराजांनी पिण्याजोगे शाश्वत पाणीसाठा कसा उपलब्ध करावा हे दाखवुन दिले आहे.15

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 147 (I)
Agriculture & Water Management in Historical Period in India
March 2019
UGC Approved No. 40705

थोडक्यात छ.शिवाजी महाराजांनी पर्यावरणातुन व वनसंवर्धनातुन जलसंवर्धन कसे होते व पावसाचे पाणी जमीनीवर कशाप्रकारे अडवावे अडवलेले पाणी कसे मुरवावे आणि जमीनीतील पाणीसाठयात कशी वाढ करावी हे यातुन कळते. जल ही जीवन है या युक्तीप्रमाणे महाराजांनी पाण्याला स्वराज्यात महत्वाचे स्थान दिले त्यामुळेच जलसंवर्धन व जलव्यवस्थापनाच्या माध्यमातुन पाण्याचे नियोजन कसे करावे हे दाखवुन दिले. आज आपणाला जमीनीवर पाण्याचे दुर्भिक्ष जानवते पण महाराजांनी 17 व्या शतकात किल्ल्यावर पाणी विपुलप्रमाणात उपलब्ध केले यावरुनच त्यांच्या दुरदृष्टीची कल्पना दिसुन येते. संयुक्त राष्ट्रसंघाने 2003 हे वर्ष शुध्द जलवर्ष म्हणुन जाहीर केले होते पण महाराजांनी 17 शतकातच हे धोरण जाहीर केले होते त्यामुळे आज पाण्याची समस्या सोडवण्यासाठी महाराजांचे धोरण जर राबवले तर ही समस्या सोडवता येवु शकते.

संदर्भ :–

1. प्रा.वराट, पर्यावरण शिक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन, अर्थव प्रकाशन, पुणे पृ. 37
2. भरुचा एरक, पर्यावरणशास्त्र, ओरीएंटल प्रकाशन, मुंबई,2007,पृ.124
3. दैनीक एकमत, 07/12/2006 पृ.12
4. रायगड किल्ला परीक्षण
5. वांळीबे वी.स.,श्री शिवराय, मोरया प्रकाशन, डोंबिवली, 1995,पृ.84
6. किल्ला रायगड
7. दांडेकर गो.नि., शिवतीर्थ रायगड, देशमुख प्रकाशन, नाते रायगड पृ.11
8. मेंहेदळे भा.ग., श्रीराजा शिवछत्रपती, भाग 1, डायमंड प्रकाशन, पुणे, 2007,पृ.429
9. कुलकर्णी अ.रा.,मराठयांचा इतिहास, पृ.115
10. पत्रसारसंग्रह, खंड 2, पृ.43
11. पाटील रमेश, सफर पन्हाळगड परीसराची, पृ. 12
12. पवार जयसिंगराव, शिवाजी व शिवकाल, फडके प्रकाशन कोल्हापुर, पृ.277
13. सिंधुदुर्ग किल्ला
14. किल्ले प्रतापगड
15. सिंहगड

OUR HERITAGE
ISSN : 0474-9030 Vol-68, Special Issue-11
Impact Factor (2020) - 6.8

# मराठवाड्यातील किल्ले

**प्रा.बालाजी रावसाहेब बोडके**
इतिहास विभागप्रमुख
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव
मो.9657678244

मराठवाडा हा प्रदेश कला, स्थापत्य, शिल्पकला व चित्रकला या घटकांनी समृद्ध असा प्रदेश आहे. एवढेच नव्हे तर मराठवाड्याच्या वैभवाबरोबर महाराष्ट्राचे व देशाचे वैभव वाढविणारे कलास्थापत्य मराठवाड्यात आहे. ज्यात लेण्या, मंदिरे, गुरुद्वारा, मशिदे, किल्ले, शिल्पकला, चित्रकला, व वास्तुकला इत्यादी घटकांनी मराठवाड्याच्या नव्हे तर महाराश्ट्राच्या व देशाच्या वैभवात भर घातलेली आहे. 'शिल्प बोलती संस्कृती' याप्रमाणे मराठवाड्याची संस्कृती ही कलेच्या माध्यमातून व्यक्त होते. भारतीय संस्कृतीत 64 कलांचा उल्लेख आलेला आहे. त्यातील बऱ्याच कलांचा विकास मराठवाड्यात झाला आहे. त्यातील शिल्पकला, चित्रकला, वास्तुकला, इत्यादी होय. अजिंठ्याची चित्रकला आणि वेरूळची शिल्पकला ही जगप्रसिद्ध कलावैभव आहे. जे की मराठवाड्याची देण आहे. अशा मराठवाड्यात वास्तुकलेतील एक दुर्लक्षित घटक म्हणजे किल्ला हा होय. भारतीय युद्ध शास्त्रात किल्ल्याचे महत्त्व अगदी प्राचीन काळापासून मानले गेले आहे आणि किल्ल्यांनी मराठवाडा समृद्ध आहे. म्हणून दुर्लक्षित झालेल्या किल्ल्यांचा व स्थापत्य कलांचा अभ्यास करण्यासाठी मराठवाड्यातील किल्ले हा विषय घेऊन प्रस्तुत शोध निबंध सादर करत आहे.

प्रस्तुत शोध निबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला असून त्यासाठी प्राथमिक, दुय्यम वर्तमानपत्रे संदर्भ साहित्य व प्रत्यक्ष किल्ल्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**उद्दिष्टे :**

1. मराठवाड्यातील किल्ल्यांचा अभ्यास करणे.
2. किल्ल्यावरील संरक्षण विषयक अवशेषांचा अभ्यास करणे.
3. किल्ल्यावरील जलव्यवस्थापनाचा अभ्यास करणे.
4. किल्ल्याकडे झालेल्या दुर्लक्षाचा अभ्यास करणे.
5. आजच्या परिस्थितीत किल्ल्यांचे महत्त्व पटवून देणे.

**गृहितके :**

1. मराठवाड्यातील किल्ले हे वनदुर्ग व स्थलदुर्ग आहेत.
2. मराठवाड्यातील किल्ल्यांवर अजूनही अवशेष अभ्यासावाचून बाकी आहेत.
3. किल्ल्यावरील जलव्यवस्थापन उत्कृ आहे.
4. किल्ल्यांमुळे इतिहासाला उजाळा मिळु शकतो.
5. किल्ल्यांमुळे रोजगार मिळू शकतो व पर्यटन विकसीत होऊ शकते.

कौटिल्याने 'अथशास्त्र' या ग्रंथात सप्तांग सिद्धांत मांडत असतांना राज्याच्या सात अंगापेकी दुर्ग हे एक महत्त्वपूर्ण अंग मानलेले आहे. कौटिल्याने दुर्गाची तुलना बाहु म्हणजेच भुजा याबरोबर केलेली आहे. त्यांनी चार प्रकारचे दुर्ग सांगितलेले आहेत, ज्यात

**1. औदिक दुर्ग :**
ज्यांच्या भोवती पाणी असते, ज्याला आपण आज जलदुर्ग म्हणतो.

**2. पार्वत दुर्ग :**
ज्यांच्याभोवती डोंगररांगा आहेत, ज्याला आपण आज गिरीदुर्ग किंवा गड म्हणतो.

**3. धान्वन दुर्ग :**
ज्यांच्याभोवती जमिन आहे, ज्याला आपण आज भुईकोट म्हणतो.

**4. वन दुर्ग :**
ज्यांच्याभोवती वन व जंगल आहे, ज्याला आपण आज वनदुर्ग म्हणतो.

OUR HERITAGE
ISSN : 0474-9030 Vol-68, Special Issue-11
Impact Factor (2020) - 6.8

असे किल्ल्यांचे 4 प्रकार सांगितलेले आहेत. म्हणजेच प्राचिन काळात कौटिल्याने किल्ल्यांचे महत्त्व प्रतिपादन केलेलं आहे. पुढील काळात रामचंद्रपंत आमात्य यांनीही गडकोटाचे महत्त्व सांगताना म्हणतात, "संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग गटकोट विरहित जे राज्य त्या राज्याची स्थिती म्हणजे अभ्रपटल न्याय आहे. गटकोट म्हणजे राज्याचे मुळ, गटकोट म्हणजे खजिना, गटकोट म्हणजे सैन्यांचे बळ, गटकोट म्हणजे आपले वसतिस्थळे, गटकोट म्हणजे सुखनिद्रागार किंबहुना गटकोट म्हणजे आपले प्राण रक्षण."

कौटिल्याप्रमाणेच रामचंद्रपंत आमात्यांनीही शिवकाळात गटकोटाचे महत्त्व विषद केले त्यावरुन छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यात किल्ल्याला महत्त्वाचे स्थान दिले आणि किल्ल्याचे संरक्षण म्हणून आपल्या विश्वासातील माणसांची किल्ल्यावरील पदावर नियुक्ती केली. शिवाजी महाराजांचा संपूर्ण इतिहास हा गटकोटांनी रेखाटलेला आहे. यावरुन शिवकाळात किल्ल्याला किती महत्त्व होते हे दिसून येते.

किल्ल्याच्या स्थितीच्या आधारावर भुईकोट किल्ले, डोंगरी किल्ले आणि बेटावरील किल्ले असे तीन प्रमुख प्रकार पाडले जातात. भुईकोट किल्ल्याला भूदुर्ग, डोंगरी किल्ल्याला गिरीदुर्ग आणि बेटावरील बांधलेल्या किल्ल्याला जलदुर्ग असे म्हटले जाते. मराठवाड्यात भुईकोट व डोंगरी हे दोन प्रकारचे किल्ले आढळतात, कारण मराठवाड्याला समुद्रकिनारा लाभलेला नाही. मराठवाड्याची भुमी दुर्गसंपदेच्या दृीने तितकीच महत्त्वाची समजली जाते. गिरीदुर्ग देवगिरी, नळदुर्ग, परांडा, उदगिर, कंधार, धारुर इत्यादी ठिकाणी किल्ल्यांच्या भव्य वास्तु आजही गतकाळाच्या वैभवाची साक्ष देतात. मराठवाड्यात किल्ल्यांची निर्मिती ही सातवाहन कालखंडापासून ते राष्ट्रकुट, चालुक्य, यादव, मोगल व मराठा कालखंडापर्यंत ही परंपरा चालु होती. मराठवाड्यात जशी मंदिरे बांधली गेली तशी किल्लेनिर्मितीही करण्यात आली. प्राचीन काळापासून ते निजामी राजवटीपर्यंत मराठवाड्यातील किल्ल्यांनी इतिहासाची जडणघडण करण्यात महत्त्वाची भुमिका पार पाडली.

मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यात 1.फरदापूर 2.वेताळवाडी, 3.वैशागड, 4.सुतोंडा, 5.अजिंठा सराई, 6. अजिंठा, 7.अंतुर, 8.पेडका, 9.लहुगड, 10.देवगिरी, 11.भांगशी, 12.अभासगड, 13.असई, 14.दुदमाळ, 15.पंढरपूर, 16. शहाबाद, 17.भंडारगड. परभणी जिल्ह्यात 1.जितूर, 2.पाथरी. जालना जिल्ह्यात 1.जालना, 2.रोहिलगड. बीड जिल्ह्यात 1.आडस, 2.कडा, 3.वडगाव, 4.धारुर, 5.धर्मापुरी. नांदेड जिल्ह्यात 1.माहुर, 2.नांदेड, 3.कंधार, 4.बेटमोगरा. उस्मानाबाद जिल्ह्यात 1.परांडा, 2.नळदुर्ग. तर लातूर जिल्ह्यात 1.औसा, 2.उदगिर इत्यादी ठिकाणी किल्ल्यांचे अस्तित्व आढळते. यावरुन मराठवाडा किल्ल्यांनी किती समृद्ध आहे हे दिसून येते. जवळपास व्यवस्थितपणे असलेले 23 किल्ले आणि बरेच किल्ले नामशेष झालेले आहेत व होत आहेत. त्याकडे मराठवाड्यातील जनता आणि सरकारचे लक्ष असणे गरजेचे आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी म्हणून मराठवाड्यातील काही निवडक किल्ल्यांचा आढावा पुढीलप्रमाणे घेत आहे.

**1. किल्ले देवगिरी :**

किल्ले देवगिरी हा किल्ला अजिंक्य, भव्य आणि बुलंद दुर्ग म्हणून ओळखला जातो. याची निर्मिती कदाचित सातवाहन कालखंडापासून झालेली असावी. परंतू प्रत्यक्ष पुराव्याच्या आधारे या किल्ल्याची निर्मिती राष्ट्रकुट राजा श्रीवल्लभ याने केल्याची माहिती मिळते. त्याने इ.स.8 व्या शतकात ह्या किल्ल्याची निर्मिती केली. हा दुर्गराज म्हणजे एका प्रचंड भुईकोट किल्ल्यामध्ये सुरक्षित सांभाळलेले दुर्गरत्न आहे. या किल्ल्याला सात वेशी असून 2 कि.मी.लांबीची भक्कम तटबंदी आहे. तटबंदीस कटक असे म्हणतात. तटबंदीवर अनेक ठिकाणी बुरूज आहेत. आणि बुरूजावर बुलंद तोफा ठेवण्यात आलेल्या आहेत. या किल्ल्यावर मेंढातोफ, दुर्गातोफ ही आजही अस्तित्वात आहेत. तसेच जयस्तंभ चांदमिनार, भुयरीमार्ग, जनार्दनस्वामीची समाधी, भारतमाता मंदीर, सार्वजनिक स्वच्छता गृहे, सार्वजनिक स्नानगृहे, खंदक, जलव्यवस्थापनाची केलेली उत्कृ रचना इत्यादी यावरुन देवगिरी किल्ला हा दुर्गराज म्हणून ओळखला जातो. मराठवाड्याच्या वैभवात भर घालण्याचे काम देवगिरी म्हणजेच दौलताबादचा किल्ला करतो, नव्हे तर महाराष्ट्राच्या आणि देशाच्या वैभवात भर घालतो.

**2. किल्ले कंधार :**

नांदेड जिल्ह्यातील कंधार येथे हा किल्ला आजही व्यवस्थितपणे अस्तित्वात आहे. या किल्ल्याभोवती 90 फुट रुंदीचा व 15 फुट खोलीच खंदक आहे. या किल्ल्याचे राष्ट्रकुट राजा कृष्ण तृतीय यांच्याकाळात बांधकाम झाले. पुढे चालुक्य याने त्याची डागडुजी केली. या किल्ल्याला असलेली भक्कम तटबंदी प्रवेशद्वार, हमामखाने, जनानखाने, मदीनामहाल, हवा महाल, इमारती व उत्कृपणे केलेले जल व्यवस्थापन हे या किल्ल्याचे वैशिष्ट्यो आहे. या किल्ल्यात तीनही तुमध्ये मुबलक प्रमाणात पाणी आढळुन येते. यावरुन जल व्यवस्थापनाचे केलेले नियोजन लक्षात येते.

OUR HERITAGE
ISSN : 0474-9030 Vol-68, Special Issue-11
Impact Factor (2020) - 6.8

**3. किल्ले परांडा :**

पलियण्ड किंवा परियण्ड या कानडी शब्दापासून परांडा हा शब्द बनला आहे. त्याचा अर्थ रमणीय स्थान असा होतो. हा किल्ला बहामनी साम्राज्याचा वजीर महमूद गवान याने 1477 ला बांधकाम पूर्ण केले. या किल्ल्याला 26 बुरूज, खंदक, भक्कम तटबंदी, भुयारे, तोफा, मंदीरे, मस्जिद, बगिचे, उत्कृ जल व्यवस्थापन इत्यादी अवशेष आजही आढळून येतात.

**4. धारुर :**

बीड जिल्ह्यातील धारुर येथे जो किल्ला आहे त्याचे बांधकाम आदिलशाहीच्या काळात पूर्ण झालेले आहे. हा किल्ला कदाचित आदिलशाहीच्या पूर्वीच निर्माण झालेला असावा. या किल्ल्याला असलेली भक्कम तटबंदी, टेहळणी बरुज, मुख्य दरवाजा, तलाव, कडेलोट, इत्यादी अवशेष आजही आढळून येतात.

**5. नळदुर्ग :**

नळदुर्ग हा किल्ला हिंदुराजा नळ याने आपल्या मुलासाठी बांधला, त्यामुळे त्यास नळदुर्ग असे म्हटले जाते. या किल्ल्याचे मुळ बांधकाम चालुक्य राजा नळपती तिसरा याने इ.स.537 मध्ये केले. या किल्ल्याभोवती 50 फुट रुंद व 25 फुट खोल खंदक आहे. भक्कम तटबंदी आहे. फांजी आहेत, चरया आहेत, प्रवेशद्वार, बुरूज, तोफा, जंगी, अंबारखाना, निजामकोट, मस्जिद, राणीमहाल, उद्यान, स्नानगृहे, दारुखाना, रंगमहाल, कैदखाना, हत्तीखाना, पाणीमहाल, इत्यादी घटक आजही पहावयास मिळतात.

**6. किल्ले उदगीर :**

लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे बालाघाटच्या डोंगर रांगेत हा किल्ला वसलेला आहे. उदगीरच्या किल्ल्यात उदलींग महाराजांचा मठ व शिवलिंग आहे. बदामीच्या चालुक्यांच्या काळात हा किल्ला बांधला आहे. परंतू यादव राजा सिंघनदेवाच्या इ.स.1178 च्या शिलालेखात यादवराजा भिल्लम सहावा हा शासक असल्याचा उल्लेख आहे. म्हणजेच भिल्लम सहाव्याने हा किल्ला पर्नबांधणी केलेला आहे. या किल्ल्याला भक्कम तटबंदी आहे, सुसज्ज प्रवेशद्वार, बुरूजे, अकोणी विहिर, हौद, कारंजे, बगिचे तोफा, इत्यादी ऐतिहासिक अवशेष आजही अस्तित्वात आहेत.

**मराठवाड्यातील किल्ल्यांचे वैशिष्ट्यो :**

1. भक्कम तटबंदी पहावयास मिळते.
2. खंदक हे मराठवाड्यांच्या किल्ल्यांचे विशेष आहे.
3. प्रत्येक किल्ल्यात जल व्यवस्थापनाला महत्त्व दिल्याचे दिसून येते.
4. किल्ल्यावर स्नानगृहे आणि शौचालये आढळून येतात.
5. किल्ल्यावर बागबगिचे व उद्याने दिसून येतात.
6. किल्ल्याभोवती तटबंदी आणि तटबंदीत बुरूजे आहेत.
7. अनेक किल्ल्यात भुयारी मार्ग आहेत.
8. बऱ्याच किल्ल्यात अंबरखाना आहे.

अशाप्रकारे मराठवाड्यातील किल्ल्यांचे वैशिष्ट्ये सांगता येतात. मराठवाड्यातील एकुण जवळपास 23 किल्ल्यांपैकी 10 गिरीदुर्ग, 2 वनदुर्ग, 9 स्थलदुर्ग, 2 सराई असे एकुण 23 किल्ले आजही व्यवस्थितपणे अस्तित्वात असल्याचे आपणाला दिसून येते. असे अनेक किल्ले दुर्लक्षित आहेत. आणि त्याकडे लक्ष देणे हे आपले कर्तव्य आहे. मराठवाड्यातील किल्ले हे मराठवाड्याचा वैभव आणि मराठवाड्याचा इतिहास आहे. मराठवाड्याचा इतिहास जपणे हे आपले मुलभूत कर्तव्य आहे. किल्ले हे स्वातंत्र्याची, मांगल्याची आणि संस्कृतीचे प्रतिके आहत. आज त्यांची ना दुरुस्ती, ना साफसफाई जर याकडे मराठवाड्यातील जनता आणि शासनाने लक्ष दिले तर आज हे पर्यटनाचे केंद्र बनतील. मराठवाड्याचा खरा इतिहास जनतेपुढे येईल, पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती होईल आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल व मराठवाड्याचा अनुशेष भरुन निघेल.

माणसे लढाई करता–करता थकुन जातील आणि कंटाळा येऊन विश्रांती घेतील परंतू किल्ले हे देशाचे निस्सिम सेवक हे कधीही न थकणारे, आपल्या देशाचे बहादुर शिपाई. रात्र असो किंवा दिवस असो सदोदित पहाऱ्यावर उभे रहावे. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यरक्षणासाठी किल्ल्यांनी सतत पहारा दिल्याचे प्राचिन काळापासून दिसून येते. हे किल्ले म्हणजे मराठवाड्याच्या वैभवाची, ऱ्याच्या एकता आणि एकात्मतेची प्रतिके आहेत. मराठवाड्याचा इतिहास आणि संस्कृति कायम ठेवण्यासाठी किल्ल्यांचे संवर्धन होणे आवशयक आहे. कालपरत्वे मराठवाड्याची माहिती

**OUR HERITAGE**
*ISSN : 0474-9030 Vol-68, Special Issue-11*
Impact Factor (2020) - 6.8

सांगणारे अनेक साधने न होतील परंतू किल्ले मात्र अजूनही हजारो, लाखो वर्ष माहिती सांगण्यासाठी उभे असतील हेच मराठवाड्याचे खरे वैभव आहे.

**संदर्भ**

1. प्रा.माटे म.श्री., मराठवाड्याचे कला वैभव
2. श्री.तापीकर श्रीकांत, महाराष्ट्रातील किल्ले
3. दांडेकर गो.नि., किल्ले
4. मांडे प्रमोद मारोती, गड किल्ले महाराष्ट्राचे
5. डॉ.रोडे सोमनाथ, मराठवाड्याचा इतिहास
6. डॉ.कठारे अनिल, मराठवाड्याचा इतिहास